**प्रेस नोट** दि.०३/०८/२०१९

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

### वेश्या व्यवसायातून पर राज्यातील मुलीची सुटका

दि.०२/०८/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार १७८१ शिंदे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वेश्या व्यवसायातील एजंट नामे- हिमांशू व संदीप हे वेगवेगळया हॉटेलमध्ये मुली ठेवून स्वतः तसेच त्यांचे एजंट साथीदारांच्या साहाय्याने ग्राहकांना मुलींचे फोटो पाठवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून, ग्राहकांना मुली ठेवलेल्या ठिकाणी वेश्या गमनासाठी पाठवितात अथवा ग्राहकांच्या मागणीनुसार संबंधित ठिकाणी पाठवितात व ते वेश्या गमनाकरिता आलेल्या ग्राहकाकडून ३ हजार रू. नमूद मुली मार्फत अथवा त्याचे साथीदारांकडून वेश्या गमनाचे पैसे स्वीकारतात. त्यातून स्वतःसाठी व साथीदार एजंटासाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची व साथीदारांची उपजीविका भागवितात. ते कोरेगाव पार्क भागात ग्राहकांच्या मागणीनुसार वेगवेगळया ठिकाणी मुली पुरवून वेश्या व्यवसाय चालवित आहे, अशी बातमी मिळालेवरून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मदन बहाद्दरपुरे, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे यांनी पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह ओयो टाऊन हाऊस हॉटेल, रुम नं.१०१, बंडगार्डन रोड, पुणे येथे जावून छापा घातला असता छाप्यामध्ये दिल्ली येथे राहणारी एक पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून हिमांशू व संदीप पुर्ण नाव पत्ता माहित नाही हे वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे समजले असून, सदर मुलगी ही दिल्ली येथील गरीब घरातील आहे. तिचा गरीबीचा फायदा घेवून, तिला जादा पैशाचे आमिष दाखवून तिस पुण्यामध्ये बोलावून घेवून तिचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत आहेत, असे तपासात निष्पन्न झाल्याने, वर नमूद एजंटाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व तिस शासकीय महिला राज्यगृह, मुंढवा, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.शिरीष सरदेशपांडे सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.श्रीमती डॉ.प्रिती टिपरे सो., सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे, श्री.किरण लोंढे, सहा.पोलीस निरीक्षक, श्रीमती मनिषा टुले पोलीस उप निरीक्षक, पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, हर्षदा शिंदे, रियाज शेख, सुनिता खोमणे यांनी केलेली आहे.